वर्ष-०७ | अंक-४० | मुंबई, मंगळवार २४ ते ३० ऑगस्ट २०२१ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ● कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2 जागतिक वडापाव दिनानिमित्त घरी बनविलेले वडे खाण्याचा डॉक्टरांचा आग्रह

3 → तब्बल 8972 मुंबईकरांना महापालिकेची नोटीस

भाईंदर येथे चालणाऱ्या अनधिकृत वेश्या व्यवसायावर कारवाई करून 04 पिडित मुलींची सुटका ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

# राज्य सरकारने दहीहंडीला परवानगी नाकारली

***मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्रातल्या गोविंदा पथकांच्या प्रतिनिधीसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला निर्णय***

मुंबईसहीत महाराष्ट्रामध्ये दहीहंडी आयोजित करण्याला राज्य सरकारने परवानगी नाकारली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्रातल्या गोविंदा पथकांच्या प्रतिनिधीसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. करोनामुळे मागील वर्षी मुंबई, ठाण्यासहीत राज्यभरातील दहीहंडी पथकांनी उत्सव साजरा केला नव्हता. यंदा छोट्या प्रमाणात का असेना उत्सवाला परवानगी द्यावी अशी मागणी केली होती. जागेवरच मानाची हंडी फोडण्यास परवानगी द्यावी अशी मागणी समन्वय समितीने प्रशासनाकडे केली. तसेच सर्व गोविंदांना लशीचे दोन डोस पूर्ण



करणार आणि सुरक्षित दहीहंडी उत्सवाची जबाबदारी आमची असेल असं या बैठकीमध्ये समन्वय समितीने सरकारला सांगितलं.दहीहंडी साजरी केल्याने जास्त मोठ्या प्रमाणावर करोनाचा प्रभाव वाढू शकतो असं टास्क फोर्सने सांगितलं असल्याचं सरकारकडून स्पष्ट करण्यात आलं. हा उत्सव जागतिक स्तरावर टीकावा अशी बाजू समन्वय समितीने मांडली. गणेशोत्सवाप्रमाणे नियम आखण्याची मागणीही समितीने केली. मात्र बैठकीला उपस्थित असणारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परवानगी का देऊ शकत नाही हे समन्वय समितीच्या सदस्यांना समजावून सांगितलं.एकदा परवानगी दिली आणि प्रभाव वाढला तर उत्सवाला आणि संस्कृतीला गालबोट लागेल. यावेळी तुमची इच्छा असली तरी सरसकट परवानगी देता येणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आम्ही गोविंदा पथकांवर लक्ष कसं ठेवणार. यंत्रणांवरील ताण वैगेरे पाहता मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक आवाहन केलं आहे. परवानगी नसल्याने आम्ही दहीहंडीचं आयोजन न करण्याची भूमिका घेणार आहोत, असं समन्वय समितीने सांगितलं आहे.गेल्या दीड वर्षापासून देशभरात करोना ठाण मांडून बसला आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या सण-उत्सवांवर करोनाचं सावट असल्याचं दिसून येत आहे. गेल्या वर्षी सर्वच उत्सव रद्द करावे लागल्यामुळे गणेश मंडळांपासून...पान २ वर...

## सलग दुसऱ्या दिवशी कोंडी



ठाणे / डोंबिवली : ठाणे आणि कल्याण-डोंबिवली शहरात रविवारी दुपारी रक्षाबंधननिमित्त नातेवाईकांकडे जाण्यासाठी अनेकजण वाहनांसह घराबाहेर पडल्याने रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाली होती. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे कोंडीत भर पडली. रात्री उशिरापर्यंत ही कोंडी कायम होती.

ठाणे, कळवा, घोडबंदर, माजीवाडा, शिळफाटा परिसरात १० ते १५ मिनिटाचे अंतर पार करण्यासाठी अर्धा तास लागत होता. तर, नेवाळी, काटई नाका परिसरात एक ते दीड तास वाहने जागची हलत नव्हती. पूर्व द्रुतगती महामार्गावरील मुलुंड टोलनाका ते तीन हात नाक्यापर्यंत वाहतूक कोंडी झाली होती. ठाणे बेलापूर मार्गावर कळवा...पान २ वर...

## अनिल देशमुखांच्या अडचणी वाढणार?

**ईडीकडून दोन सहकाऱ्यांविरोधात आरोपपत्र दाखल**



महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याविरुद्ध कथित मनी लॉंडरिंग प्रकरणातील कारवाई थांबण्याची चिन्हे नाहीत. अनिल देशमुख यांना आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ईडीनं आत्तापर्यंत ५ वेळा समन्स बजावले आहेत. पाचवं समन्स मंगळवारी १७ ऑगस्ट रोजी बजावलं होतं. मात्र, अनिल देशमुख चौकशीसाठी ED समोर हजर झाले नव्हते. या पार्श्वभूमीवर अनिल देशमुख चौकशीसाठी का हजर होत नाहीत आणि कधी होणार? याविषयी चर्चा सुरू आहे. दरम्यान, आज अंमलबजावणी संचालनालय (ED) अनिल देशमुख यांचे सहकारी कुंदन शिंदे आणि संजीव पालांडे यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. त्यामुळे अनिल देशमुखांच्या अडचणीत आणखी वाढ होणार आहे. अनिल देशमुख चौकशीसाठी का हजर होत नाहीत आणि कधी होणार? याविषयी चर्चा सुरू असताना त्यांनी स्पष्टीकरण दिलं होतं. न्यायालयीन चौकशी पूर्ण झाल्याशिवाय मी चौकशीला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका अनिल देशमूख यांनी मांडली होती. एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी ही माहिती दिली होती. "माझी ईडीच्या बाबतीतली याचिका सर्वोच्च न्यायालयाने स्विकृत केली आहे. सर्वोच्च न्यायालय ही याचिका लवकरच ऐकून घेणार आहे. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने मला खालच्या न्यायालयामध्ये जाण्याची मुभा सुद्धा दिली आहे. त्यामुळे आता ही न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मी स्वतः ईडीच्या समोर जाणार आहे व त्यांना सहकार्य करणार ...पान २ वर...

## पैसे दिले नाहीत म्हणून राग

**आईची धारदार शस्त्राने हत्या, सोलापुरातील धक्कादायक घटना**



सोलापूर : शहरातील मित्र नगर शेळगी येथील सुनील नगरमध्ये मुलाने आईचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी संशयित आरोपी अतुल एकनाथ कोळेकर याला ताब्यात घेतले आहे. अतुलला दारुचे व्यसन होते. काही दिवसांपूर्वी अतुलने आपली आई वंदना एकनाथ कोळेकर यांच्याकडे पैशाची मागणी केले होती. आईने पैसे न दिल्याच्या रागातून अतुल याने हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मध्यरात्री दीड वाजता आईची हत्या ही घटना रात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडली आहे. आईच्या डोक्यात कुकरी सारख्या धारदार शस्त्राने हल्ला करून ठार मारण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी आरोपी अतुल याने आई वंदनाकडे पैसे मागितले होते ते तिने दिले नसल्याचा राग आरोपीच्या मनात होता. ...पान २ वर...

## मित्राच्याच सात वर्षाच्या मुलाचा घेतला बळी

कोल्हापूर, मित्राच्या घरात त्याने श्रावणातला उपवास सोडला, दुसऱ्या दिवशी वास्तुशांतीचं गोड जेवणही घेतलं आणि त्याच दिवशी त्याने मैत्रीचा घात केला. मित्राच्याच सात वर्षाच्या मुलाचा बळी घेणाऱ्या खुन्याला फाशी द्या म्हणत ग्रामस्थांनी पोलिस ठाण्यावर मोर्चा काढला. दोन दिवसापासून नरबळीचा संशय व्यक्त होत असताना अजूनही खरे कारण स्पष्ट न झाल्याने गुंता वाढत निघाला आहे. कागल तालुक्यातील सोनाळी या गावातील वरद रवींद्र पाटील याचे अपहरण करून त्याचा खून केल्याचे शुक्रवारी उघडकीस आले होते. हा खून रवींद्र पाटील यांचा मित्र असलेल्या दत्तात्रय मारूती वैद्य याने केल्याचे तपासात पुढे आले. खून केल्याची कबुली त्याने दिली असली तरी कारण मात्र अजूनही तो सांगत नाही. वैद्य याचे पंधरा वर्षापूर्वी लग्न झाले आहे. अजूनही त्याला मुल होत नसल्याने त्याने नरबळी म्हणून वरदचा बळी दिल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. शनिवारी सोनाळी व सावर्डे बु. येथील पाच हजारावर ग्रामस्थांनी मुरगूड पोलिस ठाण्यावर मोर्चा




काढला. खुन्याला फाशी द्या, वरदला न्याय द्या अशा मागण्या करत महिलांनी पोलिस ठाण्यासमोर दोन तास ठिय्या आंदोलन केले. सोनाळी आणि सावर्डे या दोन्ही गावात शनिवारीही तणावपूर्ण वातावरण आहे. त्यामुळे पोलिस फाटा तैनात आहे. शनिवारी अतिरिक्त पोलिस अधीक्षक तिरूपती काकडे व पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील यांनी गावाला भेट दिली. आरोपी सापडला आहे, त्याला जास्तीतजास्त शिक्षा होईल या पद्धतीने तपास केला जाईल अशी ग्वाही त्यांनी ग्रामस्थांना दिली. आरोपीला चार दिवसाची पोलिस कोठडी मिळाली आहे. आरोपी वैद्य व मृत बालकाचे वडिल रवींद्र हे एकमेकांचे जवळचे मित्र आहेत. गेले अनेक वर्षे दोन्ही कुटुंबात जिव्हाळ्याचे संबंध आहेत. १६ ऑगस्टला वैदय कुटुंबियांनी श्रावणाचा उपवास पाटील यांच्या घरी

## भीषण अपघाताचा थरार; ट्रकच्या धडकेत बसचा चक्काचूर, वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू



बुलडाणा, यवतमाळवरून औरंगाबादच्या दिशेनं जाणाऱ्या एका बसला बुलडाण्यातील देऊळगाव राजा याठिकाणी भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. हा अपघात इतका भयंकर होता की, बसचा काही भाग चक्काचूर झाला आहे. या दुर्दैवी अपघातात एका वयोवृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य 18 प्रवासी जखमी झाली झाले आहे. यातील सहा जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर देऊळगावा राजा येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे. संबंधित बस आज सकाळी यवतमाळ बस स्थानकातून औरंगाबादच्या दिशेनं जात होती. यावेळी बसमध्ये जवळपास 25 प्रवाशी प्रवास करत होते. दरम्यान आज दुपारी एकच्या सुमारास संबंधित बस बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथून मार्गक्रमण करत होती. याचवेळी एका भरधाव ट्रकनं बसला जोरात धडक दिली आहे. हा अपघात इतका भयंकर होता की, ...पान २ वर...

## अंडरवर्ल्डच्या इक्बाल मिचीसीबत व्यवहार, प्रफुल्ल पटेल ईडी कार्यालयात, नेमकं प्रकरण काय?

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आज दुपारी ईडी कार्यालयात जाताना दिसते. पटेल यांची काही प्रॉपर्टी ईडीकडून जप्त करण्यात आली आहे. याच प्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रांवर सही करण्यासाठी प्रफुल्ल पटेल ईडी कार्यालयात दाखल झाले. पण ते कार्यालयात फार वेळ न थांबता स्वाक्षरी करुन परत निघाले.



यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना त्यांना अडवले असता त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. प्रफुल्ल पटेल यांची प्रतिक्रिया?

"खूप दिवसांपूर्वी जी प्रॉपर्टी त्यांनी जप्त केली होती त्याच प्रॉपर्टीच्या कन्फर्मेशनसाठी त्यांना स्वाक्षरी हवी होती. फारसं काही नाही", अशी प्रतिक्रिया प्रफुल्ल पटेल यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना दिली. नेमकं प्रकरण काय?

वरळी येथे सीजे हाऊस नावाची मोठी इमारत ...पान २ वर...

## पुण्यात बिर्याणी हॉटेल मालकावर कोयत्याने वार

***वादानंतर ग्राहकाचा मित्रांना बोलावून हल्ला***



पुणे : बिर्याणी घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांनी कोयत्याने वार करुन हॉटेल व्यावसायिकासह दोघांच्या खुनाचा प्रयत्न केला. पुण्यातील सिंहगड रस्ता परिसरातील धायरी भागातील गणेश नगरमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला. बिर्याणी घेण्यासाठी आलेल्या ग्राहकाचा हॉटेल व्यावसायिकाशी वाद झाला होता, त्यानंतर ...पान २ वर...

## मुंबईकरांना 'ऑगस्ट हिट'चा फटका

***तीन दिवसात तापमानात मोठी वाढ***



गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह कोकणाकडे पावसाने पाठ फिरवल्याने शहराच्या तापमानामध्ये कमालीची वाढ झालीय. भारतीय हवामान खात्याचे उप महासंचालक के. एस. होसाळीकर यांनी ट्विटरवरून याबाबत माहिती दिली आहे. मुंबई आणि उपनगर परिसरामध्ये ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासूनच तोंड फिरवल्याने मुंबईचं तापमान ऑगस्टमध्येच वाढताना दिसत ...पान २ वर...

## आई-बहिणीला इंजेक्शन देऊन संपवलं

**आत्महत्येचा प्रयत्न करणारी 30 वर्षीय डॉक्टर बचावली**

गांधीनगर : 30 वर्षीय महिला डॉक्टरने आई आणि बहिणीची हत्या करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ड्रग्जचे इंजेक्शन देऊन आई आणि बहिणीचा जीव घेतल्यानंतर महिला डॉक्टरनेही झोपेच्या गोळ्या घेतल्या, मात्र ती बचावली. गुजरातमध्ये रविवारी ही घटना घडली. नेमकं




काय घडलं? 30 वर्षीय डॉ. दर्शना प्रजापतीने आपली आई मंजुळाबेन (59) आणि धाकटी बहीण फाल्गुनी (28) यांचा जीव घेतला. काटग्राम भागातील राहत्या घरी शनिवारी रात्री ड्रग्जचे इंजेक्शन दिल्याने रविवारी सकाळी दोघींचा मृत्यू झाला. त्याच वेळी मोठ्या प्रमाणावर झोपेच्या गोळ्या घेऊन तिने स्वतःचं आयुष्यही ...पान २ वर...

# जागतिक वडापाव दिनानिमित्त घरी बनविलेले वडे खाण्याचा डॉक्टरांचा आग्रह

## पोटविकारामुळे शहरातील नागरिकांची प्रतिकारशक्ती कमी होत असल्याचे निरीक्षण

मुंबई- आज जागतिक वडा पाव दिनानिमित्त आपल्या आवडीच्या ठिकाणी मिळत असलेल्या वडा पावचे फोटो आठवणी अनेकजण सोशल मीडियावर शेयर करीत आहेत परंतु गेल्या दीड वर्षभर आपण सर्वजण कोरोनाची लढाई लढत आहोत तसेच भविष्यात येणाऱ्या संभाव्य कोरोना लाटांचा धोका लक्षात घेता जागतिक वडा पाव दिनानिमित्त घरी बनविलेले वडे खाण्याचा सल्ला वैद्यकीय क्षेत्रातून दिला आहे. याविषयी अधिक माहिती देताना घाटकोपर येथील झायनोव्हा शाल्बी हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट व लॅप्रोस्कॉपिक तज्ञ डॉ. अनिरुद्ध पाटील सांगतात, " भविष्यात कोरोना लाटेचा धोका लक्षात घेता आपली प्रतिकारशक्ती चांगली ठेवणे महत्वाचे आहे, कोरोनाचे सर्वात जास्त रुग्ण मुंबईतच आढळले होते याची कारणे अनेक असू शकतात परंतु " प्रतिकारशक्ती " हा एक महत्वाचा घटक आपल्याला विसरून चालणार नाही. मुंबईकरांचे जीवन हे घड्याळाच्या काट्यावर चालत असून आहार व विहार या दोन्ही बाबतीत मुंबईकर आजही तितके सिरीयस दिसत नाहीत. भूक लागल्यावर ८० टक्के मुंबईकर वडापाव अथवा भजी, पाणीपुरी समोसा व इतर तळलेले पदार्थ खातात व यातील ५० टक्के मुंबईकर रस्त्यावर मिळणारे पदार्थ खातात हे एका सर्वेक्षणानुसार सिद्ध झाले आहे. या फेरीवाल्यांच्या आणि दुकानांमध्ये मिळणाऱ्या पदार्थांमध्ये भजी, सामोसे, वडे अशा तळल्या जाणाऱ्या पदार्थांचं आकर्षण सर्वांत जास्त असतं. याकरता जे तेल सकाळी



एकदा काढईत टाकलं जातं, तेच दिवसभर उकळलं जात असतं. त्यातील शिल्लक तेल परत दुसऱ्या दिवशी वापरलं जातं. यामुळे त्या तेलाचे विघटन होऊन सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड तयार होतं. तेलाचा पुन्हा पुन्हा वापर केल्याने हृदयविकार, ब्लडप्रेशर, यकृताचे आजार, कॅन्सर, अपचन यासारखे दुर्धर आजार हात आहेत.तेल, चीज अशा पदार्थांच्या वापरामुळे यात असलेले भरपूर उष्मांकदेखील वजनवाढीस कारणीभूत ठरतात. २५० ते ५०० कॅलरी असलेली ही खाद्यं हृदयासाठी जास्त धोकादायक असतात. आजमितीला मुंबईतील अंदाजे ३० ते ४० टक्के नागरिक हे पोटाच्या विकारांनी त्रस्त असल्यामुळे या नागरिकांची प्रतिकारशक्ती कमी असल्याचे पाहायला मिळते व अशा नागरिकांना संसर्गजन्य आजारांचा विळखा लवकर बसू शकतो कारण या नागरिकांमध्ये अपुरी झोप, कायम पोटामध्ये मळमळ असणे, उत्साहाचा अभाव अशी लक्षणे आढळून येतात त्यामुळे बाहेरील अन्नपदार्थ खाणे टाळावे. "

पोटांच्या आजारांवर माहिती देताना तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल व रिसर्च सेंटरचे उदरविकार तज्ञ व लॅप्रोस्कॉपिक शल्यविशारद डॉ नितीन तवटे सांगतात, " पोटाच्या सर्व रोगांचे मूळ कारण हे मंद झालेला अग्नी हेच असते. त्यामुळे अजीर्ण, अपचन, बद्धकोष्ठता, आम्लपित्त, आमांश, अल्सर, मूळव्याध ,भगंदर, पित्ताशयामध्ये खडे, अल्सरेटीव कोलायटिस, कावीळ, जलोदर, लिव्हर सिरॉसिस, ग्रहणी, ईर्रिटेबल बोवेल यांसारखे अनेक विकार होतात.कोरोनाच्या पहिल्या लाटेनंतर अनेक नागरिकांनी भीतीने आयुर्वेदिक अथवा घरगुती काढ्याचे सेवन केले होते त्यामुळे अनेकांना पोटाचे व मूळव्याधीचे आजार झाले होते आता दुसऱ्या लाटेनंतर सेल्फ मेडिकेशनमध्ये वाढ झाली आहे. बऱ्याच वेळा निदान न झाल्याने पोटाचे आजार बळावतात आणि मग मोठमोठ्या शस्त्रक्रिया कराव्या लागतात. संतुलित आणि प्रोटिनयुक्त आहार व पुरेशी झोप घेऊन प्रतिकारशक्ती वाढवता येते. खाद्य विक्रेत्यांच्या स्वच्छतेबाबत, तिथे काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याबाबत आणि पदार्थांच्या शुद्धतेबाबत शासनाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे कारण जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार पोटाच्या विकाराने १० पैकी ४ भारतीय नागरिक हे पोटाच्या विकारांनी त्रस्त आहेत. काही दिवसांपूर्वी फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड अथॉरिटी ऑफ इंडियाने तीन वेळा पेक्षा जास्त तेलाचा वापर तळण्यासाठी करू नये असे आदेश जारी केले होते.

# ‘नंबर पहिला’च्या आशा उंचावल्या



नवी मुंबई : गेली वर्षभर स्वच्छता अभियानात ‘निश्चय केला नंबर पहिला’ असे ध्येय ठेवून काम करणाऱ्या नवी मुंबई महापालिकेला हागणदारीमुक्त विभागातील सर्वोच्च ‘वॉटर प्लस’ मानांकन मिळाले आहे. यात राज्यातील एकमेव नवी मुंबई शहर तर देशातील चार शहरांचा समावेश आहे. त्यामुळे शहर सर्वेक्षणाच्या मुख्य स्पर्धेत कायम राहिल्याने ‘नंबर पहिला’च्या आशा उंचावल्या आहेत.

देशभरात स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून, गतवर्षी नवी मुंबई महापालिका देशात तिसरी तर राज्यात पहिली आली होती. त्यामुळे यंदाच्या सर्वेक्षणात ‘देशात प्रथम’ येण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवत गेले वर्षभर करोनाशी लढत असतानाही काम केले आहे. यातील हागणदारीमुक्त विभागातील पहिला निकाल आला असून हागणदारीमुक्त शहरांच्या (ओडीएफ) श्रेणीमधील सर्वोच्च असणारे ‘वॉटर प्लस’ हे मानांकन मिळवले आहे.

शहर हागणदारीमुक्त पूर्वीच झाले आहे. मात्र ते कायम राहावे यासाठी महानगरपालिका दक्ष आहे. ‘गुड मॉर्निंग पथकांद्वारे याकडे लक्ष दिले जात आहे. शहरात ३९४ सार्वजनिक सामुदायिक, २२० सार्वजनिक, तर २० ‘ई टॉयलेट’ आहेत. तसेच महिलांकरिता सहा विशेष शौचालयेही आहेत. याशिवाय झोपडपट्टी भागात ५ हजार ०९४ घरगुती शौचालये अनुदानातून बांधली आहेत. शहराला पुरेशी शौचालयांची निर्मिती करून प्रशासन थांबले नाही तर महिला शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिनची सुविधा करण्यात आली आहे. दैनंदिन स्वच्छता ठेवली जात आहेच शिवाय यावर नागरिकांचेही लक्ष राहावे यासाठी शौचालयांत ‘क्युआर कोड बेस्ड’ प्रणाली बसविण्यात आली आहे. शौचालयांचा वापर केल्यानंतर नागरिकांना आपला तत्काळ अभिप्राय नोंदवता येत आहे. अपंगांसाठी विशेष शौचालयांबरोबर मुलांकरिता ‘बेबी टॉयलेट’चीही व्यवस्था करण्यात आली आहे.

### मित्राच्याच सात वर्षाच्या मुलाचा घेतला बळी पृष्ठ १ वरुन

सोडला. स्टला वरदच्या आजोबांच्या घरी वास्तुशांतीचा कार्यक्रम होता. तेथेही वैद्य कुटुंबिय उपस्थित होते. सायंकाळी वरदला बाहेर फिरायला नेऊन त्याचा खून केल्याची कबुली आरोपीने दिली आहे. खून केल्यानंतर चार दिवस वरदचा शोध सुरू होता. या शोध मोहिमेतही आरोपी सहभागी होता. पण खुनाचे कारण अजूनही त्याने सांगितले नाही. यामुळे या प्रकरणाचा गुंता वाढत निघाला आहे. दोन्ही गावासह तालुक्यात संतापाच्या भावना व्यक्त होत आहेत. दोन्ही गावातील व्यवहार दुसऱ्या दिवशीही बंद ठेवण्यात आले होते

### मुंबईकरांना ‘ऑगस्ट हिट’चा फटका पृष्ठ १ वरुन

आहे. मागील तीन दिवसांमध्ये मुंबईचं तापमान सात अंशांचा फरक पडल्याचं होसाळीकर यांनी म्हटलं आहे. होसाळीकर यांनी ट्विटरवरुन एक आलेख पोस्ट केलाय. यामध्ये त्यांनी मागील तीन दिवसांमध्ये सांताक्रुझ येथील हवामानखात्याच्या वेधशाळेत मुंबईतील तापमान वाढल्याची नोंद करण्यात आल्याचं म्हटलं आहे. आज सकाळी साडे अकराच्या सुमारास मुंबईतील तापमान ३३ अंशांवर पोहचल्याचंही त्यांनी ट्विटमध्ये म्हटलं आहे. दोन दिवसांपूर्वीच मुंबईतील तापमान हे २६ अंशांपर्यंत होतं. मात्र पावसाने विश्रांती घेतल्याने निरभ्र आकाश दिसून येत असून तापमानातही वाढ झाल्याचं होसाळीकर म्हणालेत. मुंबईतील किमान तापमानामध्ये एका अंशांनी वाढ झालीय. २० ऑगस्ट ते २ सप्टेंबर या काळात मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे. ऑगस्टच्या प्रारंभापासूनच मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये पावसाने उघडीप दिली. कडक ऊन आणि अधूनमधून येणारी एखादी हलकी सर अशा वातावरणामुळे तापमानही वाढले आहे. मुंबई उपनगरात काही दिवसांपूर्वी २६.५ अंश सेल्सिअस किमान, तर ३१.८ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदवले गेले. दोन्हींमध्ये सरासरीच्या तुलनेत २ अंशांची वाढ दिसून आली. मुंबई शहर भागात आणि रत्नागिरी येथेही कमाल तापमानात २ अंशांची वाढ काही दिवसांपूर्वीच झाली असून आता ही वाढ अधिक असल्याचं स्पष्ट होत आहे. अंदाज काय? जून व जुलै या सलग दोन महिन्यांत सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस झाला. ऑगस्टचे पहिले २० दिवस कोरडे गेले असतानाच पाऊस पुन्हा परतण्याची आशा निर्माण झाली आहे. २० ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत मध्यम स्वरूपाचा पाऊस होईल, असे हवामान विभागाच्या शास्त्रज्ञ शुभांगी भुत्ये यांनी सांगितलं आहे.

### आई-बहिणीला इंजेक्शन देऊन संपवलं पृष्ठ १ वरुन

संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र तिचा जीव वाचला असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आयुष्याचा कंटाळा आल्यामुळे टोकाचं पाऊल ड्रग्ज ओव्हरडोसमुळे मंजुळाबेन आणि फाल्गुनी यांचा मृत्यू झाला, तर डॉ. दर्शना यांच्यावर उपचार सुरु आहेत. आयुष्याचा कंटाळा आल्यामुळे टोकाचं पाऊल उचलल्याचं तिने पोलिसांना सांगितलं. आई आणि बहीण तिच्यावर अवलंबून असल्यामुळे आत्महत्येपूर्वी त्यांचाही जीव घेण्याचा निर्णय तिने घेतला. पोस्टमार्टममध्ये तिने दिलेल्या इंजेक्शनचे तपशील समजतील, असं वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. चौक बाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या काटग्राम भागातील सहजानंद सोसायटीमध्ये डॉ. दर्शना प्रजापती आपली आई मंजुळाबेन, धाकटी बहीण फाल्गुनी, भाऊ आणि वहिनी यांच्यासोबत राहत होती. घटनेच्या वेळी तिचे भाऊ आणि वहिनी घरी नव्हते. दोघींचे मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले आहेत. पोलिसांनी दर्शनाचा जबाब नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

आईस्क्रिममध्ये विष मिसळून आत्महत्येचा प्रयत्न, महिला बचावली दरम्यान, आईस्क्रिममध्ये विष मिसळून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचा जीव वाचला, मात्र अनवधानाने तेच आईस्क्रिम खाललेल्या तिच्या मुलाचा-बहिणीचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार काही महिन्यांपूर्वी केरळमध्ये समोर आला होता. आत्महत्येचा प्रयत्न आणि हत्येप्रकरणी केरळ पोलिसांनी महिलेवर गुन्हा दाखल केला होता.

### पुण्यात बिर्याणी हॉटेल पृष्ठ १ वरुन

त्याने सहा मित्रांना बोलावून हल्ला केला. गणेशनगरमधील एका बिर्याणी हॉटेलमध्ये शनिवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी मयुर मते (वय 33 वर्ष, रा. धायरी) यांनी सिंहगड रोड पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी सहा जणांच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा शनिवारी रात्री उशिरा दाखल केला. नेमकं काय घडलं? मयुर मते यांच्या गारवा बिर्याणी हॉटेलमध्ये शनिवारी दुपारी दोघे जण बिर्याणी घेण्यासाठी आले होते. त्यांच्याबरोबर मते यांची शाब्दिक आणि किरकोळ बाचाबाची झाली होती. त्याचा राग मनात धरुन दोघांनी त्यांच्या इतर साथीदारांना बोलावून घेतले. त्या दोघांनी आणि त्यांच्या साथीदारांनी हॉटेलमध्ये घुसून कोयत्यासारख्या धारदार हत्याराने त्यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने वार केला. तेव्हा हॉटेल मालकाच्या शेजारी उभा असलेल्या कामगार इसराफिल हा मध्ये आल्याने तो वार त्याच्या डाव्या हाताच्या मनगटावर बसून तो गंभीर जखमी झाला. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाला आहे. दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात अनिकेत जाधव (राहणार- मुक्ताई गार्डन, धायरी), वैष्णव झाबरे (धायरी), महेश उबाळे (नऱ्हे), ओंकार सातपुते (नऱ्हे), तेजस निवंगुणे (मुरली हॉटेल, धायरी), संकेत मिरगल (लिमये नगर, धायरी) अशी आरोपींची नावे आहेत. यातील दोन आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत, तर मुख्य आरोपीसह चार जण फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहे.

### भीषण अपघाताचा थरार; ट्रकच्या पृष्ठ १ वरुन

यामध्ये बसचा पाठिमागचा भाग चक्काचूर झाला आहे. अपघात झाल्यानंतर आलेल्या मोठ्या आवाजानं परिसरातील स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी या घटनेची माहिती त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनला दिली. तसेच अपघातग्रस्त बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका केली. यावेळी एका वयोवृद्ध आजीचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. स्थानिकांनी विलंब न करता, मृत आजीसह सर्व जखमींना देऊळगाव राजा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं. या भीषण अपघातात 18 जण जखमी झाले असून यातील 6 जणांची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, घटनास्थळाची पाहणी केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कोणावरही कारवाई केली नसून घटनेचा तपास केला जात आहे.

## पृष्ठ १ वरुन

### सलग दुसऱ्या दिवशी कोंडी

ते दिघा, मुंबई-नाशिक महामार्गावर साकेत पूल ते माजिवडा, वाघबीळ, घोडबंदर तसेच कल्याण शिळ फाटा, पलावा सिटी या भागातही वाहने अडकून पडली होती. अनेकजण स्वत:ची वाहने घेऊन घराबाहेर पडले. एकाच वेळी ही वाहने कल्याण-शिळ फाटा, नेवाळी नाका, काटई नाका परिसरात आल्याने वाहनांचा भार वाढून कोंडी झाली. शिळ फाटा रस्त्यावर वाहतूक कोंडी असल्याची पूर्वसूचना मिळाल्याने पुणे, नवी मुंबईतून येणाऱ्या वाहन चालकांनी तळोजा औद्योगिक वसाहत, खोणी मार्गे येऊन नेवाळी रस्त्याने बदलापूर, कल्याण, डोंबिवलीकडे जाण्याचा प्रयत्न केला. पर्यायी मार्ग शोधत निघालेली ही वाहने कोंडीत अडकली. नेवाळी फाटा येथे दीड तासापासून कोंडीत अडकून पडल्याची माहिती पुण्याहून कल्याणला रक्षाबंधनसाठी आलेल्या प्रशांत ठाकूर यांनी दिली. मुख्य रस्ते वाहन कोंडीने ठप्प झाल्याने २७ गाव परिसर, मलंगगड पायथा, अंबरनाथ तालुक्यातील गावांमधून कल्याण, डोंबिवली, नवी मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना मुख्य रस्त्यावर येण्यासाठी मार्ग नव्हता. कल्याणकडून येणारे नेतिवली, चक्कीनाका, टाटा नाका भागात वाहने कोंडीत अडकली होती. मलंग गडाकडे जाणाऱ्या प्रवासी बस, खासगी वाहनांना कोंडीचा फटका बसला. पोलीस बेपत्ता! वाहन कोंडी असताना एकही वाहतूक पोलीस तेथे नव्हता, असे वाहनचालकांनी सांगितले. कोंडीनंतर एक तासाने एक वाहतूक सेवक नेवाळी नाक्यावर आला. त्याला स्थानिकांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मदत केली.

### राज्य सरकारने दहीहंडीला

ते दहीहंडी मंडळांपर्यंत सर्वांचीच निराशा झाली होती. गणेशोत्सव देखील मर्यादित स्वरुपात फक्त घरगुती प्रतिष्ठापनेसाठी परवानगी देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर यंदा करोना लसीकरण सुरू झाल्यानंतर दहीहंडीला आणि इतर उत्सवांना काही प्रमाणात परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आलेली.दहीहंडी समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबतची बैठक दुपारी साडेबाराच्या सुमारास सुरु झाली. वेगवेगळ्या दहीहंडी मंडळांनी राज्य सरकारने छोट्या प्रमाणात का असेना दहीहंडी साजरी करण्यासाठी परवानगी द्यावी अशी मागणी केलेली. आज व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून ही बैठक पार पडलीमनसेची घोषणा….एकीकडे ही बैठक होत असतानाच दुसरीकडे एका महिन्यापूर्वीच मनसेनं दहीहंडी जल्लोषात साजरी करण्याचा निर्धार केला आहे. यंदा ३१ ऑगस्ट रोजी विश्वविक्रमी दहीहंडी साजरी होणार असल्याचं मनसेकडून जाहीर करण्यात आलं आहे. मनसे नेते अभिजित पानसे यांनी फेसबुक पोस्ट करून हे जाहीर केलं आहे. बुधवारी दुपारी त्यांनी ही पोस्ट केली असून त्यामध्ये “विश्वविक्रमी दहीहंडी ३१ ऑगस्टला होणार”, असं म्हटलं आहे. करोना काळामध्ये सोशल डिस्टन्सिंग आणि इतर सर्व निर्बंध लागू असताना आणि तिसऱ्या लाटेचा धोका असताना दहीहंडी किंवा गणेशोत्सव या सणांना यंदा राज्य सरकारकडून परवानगी किंवा सूट मिळेल किंवा नाही, याविषयी संभ्र असताना राज्य सरकारने काही जाहीर करण्याआधीच मनसेनं विश्वविक्रमी दहीहंडी साजरी होणार असल्याचं जाहीर केलं आहे. मनसेप्रमाणेच घाटकोपर मतदारसंघाचे भाजपाचे आमदार राम कदम यांनीही यंदा दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार असल्याचं जाहीर केलंय.गेल्या वर्षी करोनामुळे दहीहंडी झाली होती रद्दरवर्षी मुंबई आणि पुण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर दहीहंडीचा उत्सव साजरा केला जातो. यामध्ये मोठ्या संख्येनं गोविंदा पथकं सहभाग घेत असतात. अनेक राजकीय पक्ष आणि त्यांचे स्थानिक नेते देखील मोठमोठ्या दहीहंडींचं आयोजन करत असतात. त्यामुळे दहीहंडीच्या या पारंपरिक उत्सवामध्ये आर्थिक उलाढाल देखील मोठी होत असते. मात्र, गेल्या वर्षी करोनामुळे दहीहंडीचा उत्सव साजरा न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता.

### अनिल देशमुखांच्या

आहे”, असे अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. ईडीची छापेमारी… राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी १०० कोटींच्या वसुलीचे गंभीर आरोप केले आहेत. या आरोपांसंदर्भात आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अनिल देशमुख यांची ईडीकडून चौकशी सुरू आहे. या कारवाईमध्ये ईडीनं आत्तापर्यंत अनिल देशमुख यांचे हॉटेल, कॉलेज, घर अशा सर्वच ठिकाणी छापेमारी केली आहे. त्यामुळे अनिल देशमुख यांच्याभोवतीचा ईडीचा फास अधिकाधिक आवळला जात आहे. नुकतेच ईडीनं अनिल देशमुख यांना पाचव्यांदा समन्स बजावले असून त्यांना १८ ऑगस्ट रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

### पैसे दिले नाहीत म्हणून राग

यातून त्याने खून केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिसांनी तात्काळ संशयित आरोपी अतुल एकनाथ कोळेकर याला ताब्यात घेतले आहे. खुणाबाबत आणखी अन्य कोणते कारण आहे का? याचा तपास पोलीस करत आहेत. बीडमध्ये देखील मद्यपी तरुणाकडून आईची हत्या विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी बीडमध्ये देखील अशीच घटना समोर आली होती. बीडच्या चौसाळा गावात ही घटना घडली होती. हे गाव नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत येतं. आरोपी मुलाचं नाव पांडुरंग मानगिरे असं आहे. तो शुक्रवारी (20 ऑगस्ट) रात्री उशिरा घरी आला. त्याने घरी आल्यानंतर त्याची आई प्रयोगाबाई मानगिरे यांच्यासोबत वाद घातला. यावेळी त्याने आईला अमानुष मारहाण केली. या मारहाणीत आईचा दुर्दैवी मृत्यू झाला. काही तासांनी पहाटेच्या सुमारास आईचं निधन झाल्याचं नराधमाला समजलं. त्यानंतर तो घरातून पळून गेला. आरोपीला बेड्या या दरम्यान पोलिसांना या घटनेची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर आरोपी मुलाची शोध मोहिम सुरु केली. अखेर नेकनूर पोलिसांनी जालना जिल्ह्याच्या सीमेवर आरोपीला ताब्यात घेतलं. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबूल केला. पोलीस या प्रकरणाचा सविस्तर तपास करत आहेत.

### अंडरवर्ल्डच्या इक्बाल मिचीसीबत

आहे. या इमारतीच्या बांधकामाआधी त्या जागेवर एक छोटीशी इमारत होती. ही इमारत गँगस्टर इक्बाल मिर्ची याच्या ताब्यात होती. या कंपनीची पुनर्बांधणी प्रफुल्ल पटेल यांच्या कंपनीने केली होती. त्या मोबदल्यात प्रफुल्ल पटेल यांनी इक्बाल मिर्ची आणि त्याच्या कुटुंबियांना काही जागा आणि मोठ्या प्रमाणात रोख रक्कम दिली होती. या व्यवहारात गैरप्रकार झालाचा संशय ईडीला आहे. त्यामुळे पैशांची अफरातफर झाल्याचा बोट ठेवून मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. इक्बाल मिर्चीच्या नातेवाईकांना अटक या प्रकरणाचा तपास सध्या ईडी करत आहे. ईडीने याप्रकरणी कारवाई करत इक्बाल मिर्चीच्या काही नातेवाईकांना अटक केली आहे. तसेच त्याच्या काही कर्मचाऱ्यांनाही अटक केली आहे. ईडीने इक्बाल मिर्ची याची मालमत्ता देखील जप्त केली आहे. प्रफुल्ल पटेल यांनी सीजे हाऊसमधील जी मालमत्ता इक्बाल मिर्चीला दिली होती ती मालमत्ता देखील ईडीने जप्त केली आहे. 2019 च्या विधानसभा निवडणुकीआधी प्रफुल्ल पटेल यांना ईडीची नोटीस महाराष्ट्र विधानसभेची 2019 मध्ये निवडणूक पार पडली. या निवडणुकीआधी काही नेत्यांना ईडीने नोटीस बजावली होती. यामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचा देखील समावेश होता. तसेच प्रफुल्ल पटेल यांचंही नाव समोर आलं होतं. त्यावेळी प्रफुल्ल यांनी इक्बाल मिर्चीसोबत व्यवहार केल्याचं पहिल्यांदा प्रसारमाध्यमांसमोर कबूल केलं होतं. मिर्ची परिवाराशी व्यवहार केल्याची कबुली “हो मी मिर्ची परिवारासोबत आर्थिक व्यवहार केला. मी काहीही चुकीचे केलेले नाही. हा जो काही व्यवहार झाला तो कायदेशीररित्या झाला”, असं पटेल म्हणाले होते. पटेल पुढे म्हणाले, इक्बाल मिर्ची ज्याच्याकडे प्रॉपर्टी होती, याचा आमच्याशी काही संबंध नाही. सगळी कागदपत्रे पब्लिक डोमेनमध्ये आहेत.

संपादकीय...



# बोर्ड परीक्षेत 100 टक्के मार्कांची किंमत शून्य होते, तेव्हा...

नाशिकविषय ताजा, ज्वलंत आणि स्फोटक. दहावी आणि बारावी- ५० पासून ८० टक्क्यांपर्यंतचे सगळेच विद्यार्थी क्षणार्धात सामान्य झाले, कारण ९० ते १०० टक्क्यांमध्ये असणारे विद्यार्थी अमाप. महाविद्यालयांमधील मर्यादित जागांवर नव्वदीच्या पुढच्यांचा कब्जा, त्यामुळे अगदी ८०-८५ वाल्यांनासुद्धा किंमत शून्य! कारण नामांकित, दर्जेदार महाविद्यालयात त्यांना प्रवेश मिळणे केवळ दुरापास्त. आपल्या मुला/मुलीने इतका मानसिक, बौद्धिक ताण घेऊनदेखील 'हेचि फल काय मम तपाला' अशी पालकांची संत्रस्त अवस्था. आता याला जबाबदार कोण? गेली दीड-दोन वर्षे भयव्याकूळ अवस्थेत गेली. कोरोना हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे हे वास्तव स्वीकारले नाही तर शिक्षणाला काही ठिकाणी तरी नक्कीच काडीमोड मिळेल, अशी स्थिती तयार झालेली दिसते. कला वाणिज्य आणि विज्ञान या शाखांव्यतिरिक्त शिक्षण असूच शकत नाही या समजात सुशेगात जगणारी असंख्य कुटुंबे. काहींना डिग्री हवी असते; पण ती महाविद्यालयात न जाता. कोविड काळात अशी संधी आली. ऑनलाइन वर्गात न येता गुगल मीटवर डोकावून पटकन लेफ्ट होणारे खूप विद्यार्थी होते. प्रथम या तंत्राचे अप्रूप म्हणून पालकही औत्सुक्याने गुगल/ झूमवर चक्कर मारून जायचे.. नंतर त्यांचा रस आटला आणि मुलांचादेखील संपला. त्यातून ९ वी आणि ११ वी म्हणजे विश्रांतीची वर्षे. रेस्ट इयर्स! जो काही जीव काढायचा तो दहावीत आणि बारावीत..त्यामुळे केवळ त्या वर्षाचा अभ्यास या दोन वर्षांत मुले रेटत राहिली.अकस्मात ९ वी आणि ११ वीचे मूल्यमापन, मूल्यांकन करण्याचा फतवा आल्यावर सगळ्यांची गाळण उडाली. त्यामुळेच कदाचित दहावीच्या अकरा लाख विद्यार्थ्यांनी आपल्याला सीईटी-सामाईक प्रवेश परीक्षा- द्यायला आवडेल असे प्रामाणिकपणे सांगितले. न्यायालयाने मात्र या प्रवेश परीक्षेस हरकत घेतली आणि बट्ट्याबोळ म्हणावा तशी अद्भुत परिस्थिती ओढवली. काही विद्यार्थ्यांनी दहावी-बारावीमध्ये भरपूर गुण मिळविले. वेगवेगळी डिव्हाइस वापरून सिनिअर मित्रांनी आपापल्या मित्र-मैत्रिणींना मौलिक मदत केल्याने अनेकांना पैकीच्या पैकी गुणांचे दान पडले. खरीखुरी अभ्यास करणारी, संकल्पना समजावून घेऊन उत्तरे देणारी, प्रकल्पासाठी जिवाचे रान करून संदर्भ मिळविणारी, नव्या तंत्रज्ञानाला आत्मविश्वासाने सामोरे जात कष्ट करणारी मुले होती, त्यांना मात्र फटका बसला. ८५ व ८८ टक्के मिळूनही ती अस्वस्थ होत गेली.या काळात काहीही झाले तरी परीक्षा नकोच असा धोशा पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी लावला. शिक्षक, प्राध्यापक मात्र या कोरोना काळात २४ बाय ७ ऑनलाइन असत. गुगल फॉर्म, गुगल मीट आणि whatsapp वर सातत्याने संवाद हाच त्यांचा उद्योग. परीक्षा आली की बहुपर्यायी प्रश्नपेढी(MCQ) तयार करायची! इमानेइतबारे शिकविणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या संगणकीय पडद्यावर दिसायचे ते फक्त चिकटविलेले फोटो. विद्यार्थी गायब. तरी नेटाने अभ्यासक्रम पूर्ण करण्याची धडपड काही शिक्षकांनी केलीच. परंतु या काळात शिकण्याकडे पाठ फिरविणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी मात्र मानसिक ताणाचे अवडंबर माजविले. कमी गुण मिळाले तर आपण आत्महत्या करू किंवा या साऱ्याला जबाबदार यंत्रणेला धरू , असा दबाव टाकायला प्रारंभ केला. आता मनाजोगत्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही तर तेच अस्त्र बाहेर काढले जाईल.विद्यार्थ्यांनी काही प्रश्न स्वतःला विचारले पाहिजेत : आपल्याला खरोखर शिकायचे आहे का? आपली कुवत नेमकी काय आहे? या कोविड काळात आपण किती वेळ वाया घालविला? नवीन काय शिकलो, कोणती कौशल्ये अवगत केली? मी काय वाचले, ऐकले, पाहिले त्याची नोंद माझ्याकडे आहे का? माझ्या अभ्यासाची दिशा कोणती? या काळात एखादी नवी भाषा, नवी तंत्रे मी अवगत् केली का? - किमान त्या त्या महाविद्यालयांनी तरी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना हे असे प्रश्न विचारावेतच.

प्रवेश, स्पर्धा, गुण यांना अवास्तव महत्त्व दिल्याने माणूस म्हणून आपण खुजे राहिलो आहोत. खुज्यांची रांग वाढत गेली की नजर आणि दृष्टीदेखील कोती राहणार; हे वैश्विक सत्य आहे. असे होऊ नये म्हणून किमान आता तरी गुणांची सूज काढून आपल्याला नेमके काय करायचे आहे, आपल्या मुलाला आपण काय मार्गदर्शन देऊ शकू याचा पालकांनी विचार करावा. महाविद्यालय कोणतेही असो, पायाभूत सुविधांचा फारसा विचार न करता स्वयंअध्ययनाचे धडेच आता जरुरीचे आहेत. या विपरीत काळात जो कुणी माहितीची कवाडे बंद करील, नुकसान त्याचेच होणार आहे.

# 'समोर कोण'चे उत्तर!

## विरोधी पक्षांच्या सोनिया गांधींनी बोलावलेल्या बैठकीस शिवसेना व द्रमुक यांची उपस्थिती जितकी लक्षणीय, तितकीच समाजवादी पक्ष वा आप यांची अनुपस्थितीसुद्धा..

विरोधी पक्षीयांस एकत्र आणण्यासाठी सोनिया गांधी यांनीच अखेर पुढाकार घेतला हे बरे झाले. त्यांच्या काँग्रेस पक्षास अद्याप अध्यक्ष नाही. आपले चिरंजीव त्यासाठी तयार आहेत की नाही, हे सोनिया यांना माहीत आहे किंवा काय हे आपणास माहीत असण्याची शक्यता नाही. राहुल अध्यक्ष होणार, नाही झाले तर नवा अध्यक्ष निवडला जाणार वगैरे सर्व प्रक्रिया या दूर दूरच्या गोष्टी. तोपर्यंत राहुल यांचे आणखी काही सवंगडी पक्ष सोडून जाणारच नाहीत याची काही शाश्वती नाही. सोनिया यांच्या बैठकीआधीच एक-दोन दिवस राहुल आणि प्रियांका यांच्या नव्या दमाच्या नेत्यांतील आश्वासक सुष्मिता देव या पक्षत्याग करत्या झाल्या. त्यांनी 'तृणमूल'ला आपले म्हटले. गेले वर्षभर ज्योतिरादित्य शिंदे, जतीन प्रसाद आदी सोडून गेले. या दोघांचे तीर्थरूप अनुक्रमे माधवराव शिंदे वा जितेंद्र प्रसाद किंवा सुष्मिता देव यांचे वडील संतोष मोहन देव हे सर्व गांधी घराण्याचे निष्ठावान. गादीवर चिरंजीव आल्यावर वडिलांच्या साथीदारांचे मोल कमी व्हावे हा भारतीय राजकारणाचा इतिहास आहे. तेव्हा राहुल गांधी यांच्या काळात राजीव-सोनिया निष्ठावानांची किंमत कमी व्हावी हे तसे नैसर्गिक म्हणायचे. 'त्या' इतिहासाच्या 'या' वर्तमानात फरक इतकाच की गांधी घराण्याचे आणि म्हणून काँग्रेसचे वारस राहुल हे पक्षांतर्गत सत्ताग्रहण करण्यास तयार आहेत की नाही, हा प्रश्न आहे. तो सुटत नसल्याने तोपर्यंत काँग्रेसकडून भाजपस दुय्यम नेत्यांचा पुरवठा होत राहिला. सोनिया गांधी यांच्या पुढाकाराने तो थांबू शकेल. हे झाले त्या पक्षापुरते. आता अन्यांबाबत.

देशातील बाकी अनेक पक्ष हे मूळच्या काँग्रेस या भव्य वृक्षाच्याच फांद्यापारंब्या आहेत. अतिवाढ झाल्याने मुळाकडे लक्ष देण्याची गरज त्या पक्षास वाटेनाशी झाली. त्यामुळे काही पारंब्यांनी मूळ वृक्षापासून फारकत घेतली आणि आपल्या स्वतंत्र वाढीची व्यवस्था केली. त्या-त्या राज्यात हे पक्ष यशस्वी ठरले. उदाहरणार्थ पश्चिम बंगालातील तृणमूल भरारी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसचा विस्तार वा आंध्रात जगन मोहन रेड्डी यांची 'वायएसआर' काँग्रेस. या पक्षाच्या नेत्यांनी सुस्तावलेल्या काँग्रेसचा त्याग केला आणि स्वत: कष्ट करून आपापले पक्ष रुजवले. तेव्हा अशा सर्वांना एकत्र आणायचे तर काँग्रेसच्या गांधी घराण्यानेच पुढाकार घेण्याची गरज होती. सोनिया गांधी यांच्या कृतीने ती पूर्ण होते. त्यातून देशभरातील १९ पक्षांचे प्रमुख सोनिया गांधी यांच्या या विरोधक संवादास हजर राहिले. यात लक्षणीय होती ती तमिळनाडूतील द्रमुक आणि महाराष्ट्रातील शिवसेना या पक्षांची उपस्थिती.




तमिळनाडूतील द्रविडी राजकारण हे देशातील हिंदीभाषकांचा दबाव, रामकृष्णकेंद्रित धर्मकारण आदींपेक्षा फार वेगळे आहे. उत्तरेचे धर्मकेंद्रित राजकारण तेथे निरुपयोगी. तरीही अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्या खऱ्या उदारमतवादी नेत्याच्या काळात द्रमुक हा भाजप आघाडीचा घटक राहिला. नंतर त्याचे दूर जाणे नैसर्गिक. तितकेच नैसर्गिक त्या पक्षाचे आता काँग्रेसकडे आकृष्ट होणे. याच न्यायाने शिवसेनेचा विद्यमान दिशाबदलही तितकाच लक्षणीय. वरवर पाहता मुख्यमंत्रीपदाचा वाद हे भाजप-सेना यांतील घटस्फोटाचे कारण वाटले तरी ते केवळ तितकेच नाही. त्यापलीकडे या ध्रुवबदलाचा विचार व्हायला हवा. एकेकाळी काँग्रेसने ज्याप्रमाणे निधर्मीवादावर फक्त आपलीच मक्तेदारी असे मानून अन्यांचा पाणउतारा करण्यास सुरुवात केली त्याच पावलावर पाऊल टाकून अलीकडचा भाजप निघाला आहे. आपण आणि फक्त आपणच तेवढे हिंदूंचे राखणदार, अन्य सर्व हिंदुहितविरोधी हा त्या पक्षाचा दर्प घटक पक्षांस उबग आणत असल्यास नवल नाही. आपणच काय ते निधर्मी; बाकीचे संकुचित धर्मवादी असे तेव्हा काँग्रेसचे वर्तन होते. आपणच तितके हिंदुहितरक्षक, अन्य सर्व पाखंडी असे आताच्या भाजपचे वागणे आहे. त्यास कंटाळून एकामागोमाग एक घटक पक्ष त्या पक्षास सोडून जात असल्यास आश्चर्य नाही. याला आळा न बसल्यास, तेव्हाच्या काँग्रेसचे जे झाले ते आताच्या भाजपचे होणार. तेव्हा शिवसेनेचा हा भाजपत्याग या नजरेतून पाहायला हवा. तसे केल्यास उद्धव ठाकरे यांचे हे कृत्य भाजपच्या इतके जिव्हारी का लागले ते लक्षात येईल. पंजाबात अकाली दल सोडून गेला आणि महाराष्ट्रात सेनेने भाजपचा हात सोडला. दीर्घकालीन भाजप-केंद्रित राजकारणाच्या विघटनाची ही सुरुवात असू शकते. तेव्हा भौतिकशास्त्राच्या नैसर्गिक तत्त्वाने हे सर्व काँग्रेसभोवती जमा होत असतील तर तोदेखील नव्या राजकीय ध्रुवीकरणाचा प्रारंभ ठरतो. म्हणून सोनिया गांधी यांच्या या कृतीचे महत्त्व.

या कृतीचा पुढील टप्पा हा अधिक आव्हानात्मक. त्यासाठी या घटक पक्षीयांस आपापल्या प्रांतात भाजपची कोंडी करण्यासाठी काँग्रेसने मोकळे सोडायला हवे. राजस्थान, पंजाब, छत्तीसगड अशी काही राज्ये सोडल्यास काँग्रेसचे अस्तित्व अन्यत्र नगण्य आहे. यात लगेच बदल होण्याची शक्यता नाही. हे वास्तव सोनिया गांधी यांनी स्वीकारले असावे. एकेकाळी ज्यांच्याकडून मुजरे घेतले त्यांनाच मुजरे करण्याची वेळ आल्याचे स्वीकारणे सोपे नसते. पण त्यास इलाज नाही. आपले संदर्भहीन होणे रोखायचे असेल तर काँग्रेसला हे कटू सत्य स्वीकारावे लागेल. तितका प्रौढपणा सोनिया यांच्या ठायी आहे. त्यामुळे २०२४ सालच्या सार्वत्रिक निवडणुका काँग्रेसला संघराज्यीय तत्त्वाने लढाव्या लागतील. म्हणजे एका बाजूस एकेकाळच्या काँग्रेसप्रमाणे केंद्रवादी भाजप आणि दुसरीकडे प्रांताप्रांतातील घटक पक्ष अशी ही लढाई झाली तर आणि तरच विरोधकांस टिकून राहण्याची आशा आहे. हे शरद पवार यांच्यासारखे काँग्रेस नेतृत्वाच्या एकेकाळच्या हटवादीपणाचा बळी ठरलेले नेते समजू शकतात आणि या अशा आघाडी राजकारणाचे महत्त्व ते सोनिया गांधी वा तत्समांस समजावूनही देऊ शकतात. १९७८ पासून २०१९ च्या राज्य विधानसभा निवडणुकांत त्यांनी हेच करून दाखवले आहे. त्या वेळी एकचालकानुवर्ती काँग्रेसविरोधात अन्यांस एकत्र आणण्याची गरज होती. आज ती गरज तितक्याच एकचालकानुवर्ती भाजपविरोधात इतरांस संघटित करण्याची आहे. त्यासाठी भाजपच्या विद्यमान यशामागे विरोधकांतील दुही आहे हे लक्षात घ्यायला हवे. राज्याराज्यांत आपली विरोधी मते फोडणे वा किमान ती एकत्र येणार नाहीत असे पाहणे हे भाजपच्या यशाचे गमक. संख्याशास्त्राच्या आधारे ही बाब सहज लक्षात येईल. म्हणून आज या पक्षांना गरज आहे ती त्यांच्या भाजपविरोधी मतांत फूट होणार नाही इतका राजकीय शहाणपणा दाखवण्याची. सोनिया गांधी यांच्या या बैठकीत उत्तर प्रदेशात भाजपच्या तोंडी फेस आणू शकतो तो समाजवादी पक्ष वा दिल्लीत भाजपला ज्याने एकहाती घुमवले तो 'आप' सहभागी झाला नाही. भाजपसाठी ही आशेची बाब असेल. म्हणून ही तटबंदी होता होईल तितकी अभेद्य करण्यासाठी या आघाडीतील धुरंधरांस आणखी प्रयत्न करावे लागतील. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणूक निकालानंतरची परिस्थिती त्यासाठी महत्त्वाची ठरेल.

राहता राहिला मुद्दा समोर कोण, या प्रश्नाचा. भारतीय निवडणूक इतिहासातील एकही निवडणूक समोर कोणी आहे म्हणून जिंकली गेलेली नाही. हे सत्य आहे. आपल्या व्यवस्थेत विरोधी पक्ष निवडणूक जिंकत नाही. सत्ताधारी पराभूत होतो. हे वास्तव लक्षात घेता 'समोर कोण' या चतुर प्रश्नाच्या उत्तरार्थ या विरोधी आघाडीने एकच सांगावे : ''गांधी घराण्यातील कोणीही पंतप्रधानपद स्वीकारणार नाही आणि संधी मिळाल्यास ही आघाडी मनमोहन सिंग यांच्याप्रमाणे एखाद्या सर्वमान्य व्यक्तीस पंतप्रधानपदासाठी पुढे करेल.'' या केवळ एका वाक्याने देशातील राजकीय वातावरणातील मरगळ दूर होऊन 'समोर कोण' हा प्रश्न निकामी ठरेल. अस्तित्वाची लढाई लढणाऱ्यांकडून इतक्या समंजसपणाची अपेक्षा करणे गैर नाही.

# तब्बल 8972 मुंबईकरांना महापालिकेची नोटीस

मुंबईत covid-19 चा संसर्ग सुरू असतानाच दरम्यानच्या कालावधीत मुंबईत महापालिकेने जवळपास ४७ हजार डासांच्या उत्पत्तीच्या ठिकाणांवर कारवाई केली आहे. या कारवाईत जवळपास ८ हजार ९७२ मुंबईकरांना नो टीसही पाठवण्यात आली आहे. मुंबई महापालिकेकडून जवळपास ८० लाख संभाव्य डास उत्पत्तीच्या ठिकाणांचा शोध घेतला गेला. त्यामध्ये ४७ हजार ठिकाणी डेंग्यू आणि मलेरियाच्या उत्पत्तीची ठिकाणे आढळली. महापालिकेने कारवाई करत ही ठिकाणे हटवलीही. मुंबई महापालिकेने पाठवलेल्या नोटीशीत बहुतांश ठिकाणे ही उच्चभ्रू वस्तीतील आहेत. त्यामध्ये झाडांच्या कुंड्या तसेच रेफ्रिजेरेटर पॉटमध्ये ही डासांच्या उत्पत्तीची ठिकाणी बहुतांशपणे आढळली आहेत.



गेल्या वर्षीच्या म्हणजे २०२० च्या आकडेवारीनुसार डेंग्यूच्या ८० टक्के रूग्णांच्या घरातच किंवा घरानजीकच या डासांची उत्पत्ती होत असल्याचे आढळले आहे. स्वच्छ साठवलेल्या पाण्यात किंवा स्थिर पाण्यात साधारणपणे डेग्युंचे डास आढळतात. साधारणपणे रोपट्यांमध्ये जी शोभेची रोपटी असतात, अशा ठिकाणी फेंग शुई, बांबू आणि मनी प्लान्ट यासारख्या झाडात हे डेंग्यूचे डास आढळतात. त्यासोबतच एअर कंडिश्नर सिस्टिम, रेफ्रिजेरेटर ट्रे मध्येही डासाच्या उत्पत्तीची स्थाने आहेत. यंदाच्या वर्षी १४ ऑगस्टपर्यंत ९८७२ मुंबईकरांना नोटीस पाठवण्यात आली आहे. अनेक मुंबईकरांच्या घरात साठवलेल्या पाण्यातच ही डासांची उत्पत्ती आढळली आहे. गतवर्षीच्या तुलनेत केसेस यंदा कमी

यंदाच्या वर्षात एकट्या जुलै महिन्यातच ५५७ डेंग्यूच्या केसेस महापालिका क्षेत्रात आढळल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत ४० टक्के डेंग्यूच्या केसेस आढळल्या आहेत. गेल्या वर्षी जुलै २०२० मध्ये याच कालावधीत डेंग्यूच्या ९५४ केसेस आढळल्या होत्या. कोरोनाच्या काळात मुंबई महापालिका क्षेत्रात डासांची उत्पत्ती शोधण्यासाठी मुंबई महापालिकेकडून १५०० कामगारांची टीम तैनात करण्यात आली आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी शोध मोहीम राबवण्याची जबाबदारी या टीमवर आहे.

# 'जनता पाहतेय, योग्य वेळी आशीर्वाद देईल'– जन आशीर्वाद यात्रेवर महापौरांची खोचक टीका



भाजपच्या जन आर्शीवाद यात्रेवरुन मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी भाजपची खिल्ली उडवली होती. पुन्हा एकदा महापौरांनी भाजपवर निशाणा साधलाय. 'भाजपची जन आशीर्वाद यात्रा ही फसवणुकीची यात्रा आहे. भाजप काय करत आहे याची लोक साक्ष देत आहे. ते योग्य वेळी त्यांचा आर्शीवाद देतील, अशी खोचक टीका मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी केली आहे. 'त्यांना खरोखर काम करायचे असे तर त्यांनी लोकांसाठी कोविड लस द्यावी', असेही महापौर पुढे म्हणाल्या. केंद्रीय मंत्री मंडळात वर्णी लागलेल्या भाजपच्या चार मंत्र्यांची राज्यातील विविध भागात जन आर्शीवाद यात्रा सुरू होणार होती. केंद्रीय मंत्री नारायण राणे हे १९ ऑगस्ट रोजी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींस्थळाला भेट देण्यासाठी येणार होते. मात्र त्या आधी ही जन आर्शीवाद यात्रा नाही तर ही जन छळवणूक यात्रा असल्याचे म्हणत महापौरांनी भाजपची चांगलीच खिल्ली उडवली होती. जनता भाजपला वैतागली आहे त्यामुळे जन आर्शीवाद मिळणार नाही, अशी टीका महापौरांनी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा महापौरांनी भाजपच्या जन आर्शीवाद यात्रेवर निशाणा साधल्याचे पहायला मिळाले. शिवसैनिकांकडून बाळासाहेबांच्या स्मृतींस्थळाचे शुद्धीकरण केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी बाळासाहेबांच्या स्मृती स्थळाला भेट दिल्यानंतर शिवसैनिकांनी स्मृतींस्थळाचे शुद्धीकरण करण्यात आले. आधी गोमुत्र शिंपले आणि त्यानंतर बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळाला दुधाचा अभिषेक घालण्यात आला. या प्रकारानंतर शिवसेना विरुद्ध भाजप यांच्यातील वाद पुन्हा एकदा पेटल्याचे पहायला मिळाले. उद्धव ठाकरेंच्या कारकिर्दीतील हे सर्वात उत्तम काम हे शुद्धीकरण करणे आहे. दुसरं ते काहीही करू शकत नाही,अशा शब्दात नारायण राणे यांनी त्यांचा संताप व्यक्त केला.

# बॉयफ्रेण्डने दुसऱ्याच मुलीसोबत लग्नगाठ बांधल्याचा राग, पुण्यात 22 वर्षीय तरुणीचा गळफास

पुणे : बॉयफ्रेण्डने दुसऱ्याच मुलीसोबत लग्न केल्यामुळे नैराश्यातून युवतीने आत्महत्या केली. पुण्यात 22 वर्षीय तरुणीने गळफास घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या प्रकरणी आरोपी प्रियकरासह त्याच्या आई वडिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काय आहे प्रकरण?


मनिषा गोविंद गायकवाड असं 22 वर्षीय तरुणीचं नाव आहे. ती पुण्यातील फुरसुंगी परिसरात राहत होती. गेल्या काही दिवसांपासून हडपसर भागात राहणाऱ्या 23 वर्षीय युवकासोबत तिचे प्रेमसंबंध होते. याविषयी तरुणाच्या आई वडिलांनाही माहिती असल्याचा दावा केला जातो.

राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या

बॉयफ्रेण्डने काहीही न सांगता दुसऱ्या मुलीसोबत लग्न केल्याचं कळताच मनिषा निराश झाली होती. यातूनच तिने आपल्या राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. या प्रकरणी मनिषाच्या वडिलानी हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

प्रियकराच्या आई-वडिलांवरही गुन्हा

पोलिसांनी आरोपी प्रियकरासह त्याच्या आई-वडिलांवरही आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास हडपसर पोलीस करत आहेत.




पत्नीच्या प्रियकराचा हत्येच्या नादात प्राण गमावले

दुसरीकडे, उत्तर प्रदेशातील पतीला आपल्या पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता. पत्नीच्या प्रियकराचा काटा काढण्यासाठी त्याने मांत्रिकाचा आधार घेतला. मात्र या नादात पतीलाच आपले प्राण गमवावे लागले. मांत्रिकाच्या भेटीवेळी ओळख झालेल्या एका व्यक्तीनेच या पतीची हत्या केली.

हमीरपूरमधील एका बड्या मांत्रिकाकडे जाण्याचं मांत्रिकाकडे भेटलेल्या शैलेंद्रने पती नीरजला सुचवलं. पत्नीच्या प्रियकरापासून मुक्ती मिळवण्यासाठी नीरज घायकुतीला आला होता. तो त्यासाठी तयार झाला. मात्र शैलेंद्रने वेगळाच प्लॅन आखला होता. मांत्रिकाला भेटवण्याच्या बहाण्याने हमीरपूरच्या जंगलात नेऊन त्याची हत्या केली.

पोलीस बातमी पत्र

मुंबई, मंगळवार २४ ते ३० ऑगस्ट २०२१



# भाईंदर येथे चालणाऱ्या अनधिकृत वेश्या व्यवसायावर कारवाई करून 04 पिडित मुलींची सुटका



भाईंदर : स्व. गोपीनाथ मुंडे क्रिडा संकुल समोर गोल्डन नेस्ट रोड नवघर भाईंदर पुर्व याठिकाणी महिला वेश्यादलाल पुजा पुजारी व तीचा साथीदार रोशन सोनवणे हे पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात. अशी गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे वपोनि श्री. एस. एस. पाटील यांना गोपनिय यांना मिळाली . त्यानुसार वपोनी/पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना पाठवुन मिळालेल्या बातमीची सत्यता पडताळून दि. २०/०८/२०२१ रोजी १.२० वा. सदर ठिकाणी छापा टाकला असता महिला वेश्या दलाल पुजा विदयाधर पुजारी वय २२ वर्ष रा. रु.नं.२०१, गोडदेव गाव, भाईंदर पूर्व व तीचा साथीदार २) रोशन अंकुश सोनवणे वय २१ वर्ष रा. रु.नं.२६, गांधीनगर झोपडपटटी, भाईंदर पश्चिम हे वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गि-हाईकाकडुन पैसे स्विकारुन मुली पुरवित असताना मिळुन आल्याने त्यांना वेश्यागमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ३ अल्पवयीन मुली व १ प्रौढ मुलीची सुटका केली. सदर बाबत महिला वेश्यादलाल पुजा पुजारी व साथीदार रोशन सोनवणे यांचे विरुद्ध नवघर पोलीस ठाणे येथे पोहवाउमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सपोनि. तेजश्री शिंदे (भरोसा सेल), पोहवा.निलंगे, मपोना. यम्बर, पो.शि. केशव शिंदे, मपोशि.सुप्रिया तिवले व चालक पो.ना. गावडे सर्व नेमणुक-अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर (प.) यांनी केली आहे.

# फ्लॅट नावावर करून घेण्यासाठी पोटच्या मुलांकडून मारहाण, पुण्यात 58 वर्षीय महिलेची पोलिसात तक्रार

पुणे : पोटच्या मुलांनीच आईचा छळ केल्याची धक्कादायक घटना पुण्यात उघडकीस आली आहे. संपत्तीमधील हिस्सा काढून घेण्यासाठी 58 वर्षीय महिलेचा छळ करण्यात आल्याचा आरोप आहे. आईलाच बेदम मारहाण करणाऱ्या दोघा मुलांवर बंडगार्डन पोलीस ठाण्यात कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काय आहे प्रकरण? अहमद अब्बास अली नईमाबादी (वय 39 वर्ष) आणि हुसेन अब्बास अली नईमाबादी (वय 32 वर्ष) अशी या दोन मुलांची नावे आहेत. नईमाबादी कुटुंबीयांनी त्यांच्याच कुटुंबातील 58 वर्षीय महिलेचा छळ केल्याचा आरोप आहे. संपत्तीमधील आईचा हिस्सा काढून घेण्यासाठी हा छळ करण्यात आल्याचा आरोप आहे.





आईला खुर्ची फेकून मारली

कोऱ्या स्टॅम्प पेपरवर आईने सह्या कराव्यात, फ्लॅट नावावर करून द्यावा अशी पीडित महिलेच्या मुलांची आणि इतर नईमाबादी कुटुंबीयांची मागणी होती. पीडित महिला तयार नसल्याने मुलाने आईला खुर्ची फेकून मारली. तसेच इतर कुटुंबीयांनी लाथा – बुक्क्यांनी मारहाण केल्याचा दावा केला जात आहे.

भावाच्या घरी गेल्याने जाचातून सुटका या मारहाणीत पीडित महिला गंभीर जखमी झाली. तशाच अवस्थेत जीव वाचवत ती पुण्यातील नाना पेठे परिसरात असलेल्या आपल्या भावाच्या घरी पोहोचली. त्यानंतर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. बंडगार्डन पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

# तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी -सराईत गुन्हेगारांना अटक करून एकुण 15 गुन्हे उघडकीस



दिनांक : २३/०८/२०२१ - तुळींज पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना तुळींज पोलीस ठाण्याचे हद्दीत जबरी चोरी, बतावणी, घरफोडी चोरीचे वाढते प्रमाण जास्त प्रमाणात होत असल्याने त्यास आळा बसावा म्हणून मा. वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी केलेल्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे सदर पथकाने गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुजरात राज्यात व नालासोपारा येथे तपास करुन ६ आरोपी १) सुरेश भिमाभाई सलाट उर्फ मारवाडी वय २३ वर्ष रा. अहमदाबाद गुजरात, २) साजीद सईद खान वय २५ वर्षे, रा. मराठीचाळ, नालासोपारा पुर्व. ३) सुमन जयसिंग गुप्ता वय-३० वर्षे, ४) विधीसंर्घष बालक,

५) राजु जयसिंग गुप्ता वय-४८ वर्षे, सातिवली रोड, वसई यांना वेगवेगळया गुन्हयात अटक व ताब्यात घेऊन त्यांचेकडून गुन्हयातील संपूर्ण ६,६४,०००/- रूपये किंमतीचे १८० ग्रॅम ५२ मिली ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व ६१,२००/- रूपये किंमतीचे वेगवेगळया कपनीचे ६ मोबाईल, असे एकूण ७,२५,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून त्यांची सखोल चौकशी करून एकुण १५ गुन्हे उघडकीस आणले आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, परिमंडळ - २, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. संदेश पालांडे, सपोनि. एम.डी.म्हात्रे, पो.उप.निरी. ज्ञानेश्वर कोकाटे, सहा.पो. उप. निरी. बाळु बांदल, शिवानंद सुतनासे, पोहवा. अनिल शिंदे, पो.ना. आनंद मोरे, उमेश वरठा, पो.शि./अशपाक जमादार, छपरीबन यांनी केलेली आहे.

# अवघे ४८ तासांत खुन्यांना केले जेरबंद नालासोपारा पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

दिनांक :- २३/०८/२०२१ मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा पोलीस ठाणेच्या हददीत दिनांक २१/०८/२०२१ रोजी सकाळी ११:०० ते ११.३० वा. च्या सुमारास चंद्रेश पॅलेस, शॉप नं. ०७, नालासोपारा (पश्चिम) येथील साक्षी ज्वेलर्स दुकानात दोन अनोळखी इसमांनी प्रवेश करुन नमुद दुकानातील ज्वेलर्स मालक किशोर मांगीलाल जैन, रा. एच/१०३, जय इंद्रपस्थ सो. नालासोपारा (प) यांचे दोन्ही हात सेलो टेपने बांधून त्यांच्या डोक्यात व शरीरावर कोणत्यातरी धारदार हत्याराने गंभीर दुखापत करुन त्यास जिवे ठार मारुन दुकानातील दागिने चोरी करून पळून गेले. याबाबत नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळी मिरा- भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ भेट देवून गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे तात्काळ गुन्हा उघडकिस आणुन आरोपी अटक करण्यासाठी गुन्हे शाखा कक्ष १, २, ३, मध्यवर्ती गुन्हे शाखा, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध वसई कक्ष तसेच परिमंडळ २ व ३ अंतर्गत येणा-या नालासोपारा, विरार, तुळींज, वालीव, माणिकपूर, अर्नाळा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी १५ पथके तयार केली व त्यांना गुन्ह्यांचा तपास करण्यास पाठविले सदर पथकाने आरोपीनी गुन्ह्याच्या ठिकाणी कुठलाही पुरावासोडलेला



नसताना गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने दोन अनोळखी आरोपी यांची ओळख पटवून त्यांची संपुर्ण नावे निष्पन्न केली. त्यातील १) पुरुष आरोपी, वय ३३ वर्षे, धंदा - इलेक्ट्रीशियन, रा. रु. नं.१५/बी, भाईंदर पुर्व, २) पुरुष आरोपी वय ४२, धंदा - इलेक्ट्रीशियन, रा. रु. नं.१०९, जिवदानी निवास, नालासोपारा, यांना दिनांक २३/०८/२०२१ रोजी नालासोपारा पुर्व येथून ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी आपला गुन्हा कबुल केला असून गुन्हा घडल्यापासून अवघ्या ४८ तासाच्या आत गुन्हयाची उकल करुन आरोपीना जेरबंद करण्यात नालासोपारा पोलिसांना यश आले.

सदरची कारवाई ही मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मा. श्री. एस. जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, मा.डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. प्रशांत वांघुडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, विरार, मा. श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. चंद्रकांत जाधव, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. सुपे, पोनि. बडाख, पोनि. कुराडे, पोनि. रणवरे, पोनि. चौधरी, सपोनि. सरक, सपोनि. जगताप, सपोनि/ फडतरे, सपोनि/ सानप, सपोनि/ पालांडे, सपोनि. गुर्जर, सपोनि. कांबळे, सपोनि. बेंद्रे, सपोनि. तळेकर, सपोनि. म्हस्के, सपोनि. स्वामी, सपोनि. आंबवणे, पोउपनि. विचारे, पोउपनि. खाडे, पोउपनि. टेलर, पोउपनि. भागवत व अंमलदार यांनी उत्कृष्टपणे कामगिरी केलेली आहे.सदर गुन्ह्याचा तपास श्री. विलास सुपे, व.पो.नि नालासोपारा पोलीस ठाणे हे करत आहेत.

# महिलेचा घरापर्यंत केला पाठलाग; शरीरसुखाची मागणी करत विनयभंग केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल



पिंपरी : महिलेचा सतत घरापर्यंत पाठलाग करून विनयभंग करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी ही घटना घडली. याप्रकरणी महिलेने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. राहुल प्रकाश गायकवाड (वय २७, रा. संजय गांधीनगर झोपडपट्टी, पिंपरी), असे आरोपीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गायकवाडने महिलेचा सतत पाठलाग केला. तसेच रविवारी फिर्यादीच्या घराचा दरवाजा वाजवला. त्या घराबाहेर आल्या असता आरोपीने त्यांच्यासोबत गैरवर्तन केले. तसेच शरीर सुखाची मागणी करून मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नाली पालांडे तपास करीत आहेत.

# रक्षाबंधनाला बहिण आली होती माहेरी; मेहुण्याकडून भावोजींची निर्घृण हत्या



कानपूर: देशभरात काल रक्षाबंधनाचा सण साजरा झाला. संपूर्ण देशात रक्षाबंधन आनंदात साजरं झालं. मात्र कानपूरमध्ये कालच एक धक्कादायक घटना घडली. बहिणीला त्रास देणाऱ्या भावोजींची हत्या भावानं निर्घृण हत्या केली. रक्षाबंधनाच्या सणासाठी घरी आलेल्या बहिणीनं पतीकडून दिला जाणारा त्रास भावाला सांगितला. त्यानंतर संतापलेल्या भावानं भावोजीची हत्या केली. रक्षाबंधन साजरं करण्यासाठी महिली पतीला घेऊन भावाच्या घरी आली होती. मद्यधुंद अवस्थेत असलेला पती मेहुण्याला शिवीगाळ करू लागला. त्यामुळे मेहुण्याला राग अनावर झाला. त्यानं धारदार सुरीनं भावोजीचा खून केला. त्याच्या वडिलांनी स्वत: पोलिसांना फोन करून घटनेची माहिती दिली. यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली.बीएसएनएलमधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यानं १४ वर्षांपूर्वी त्याच्या मुलीचा विवाह जवळच राहणाऱ्या एका तरुणाशी करून दिला. त्यांना २ मुलं आहेत. पती दारू पित असल्यानं अनेकदा घरात वाद व्हायचे. रविवारी रात्री पती त्याच्या पत्नीला घेऊन रक्षबंधनासाठी गेला होता. थोड्या वेळानं तो स्वत:च्या घरी परतला. काही वेळानंतर तो पुन्हा सासरी आला.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांच्या स्वीय सहाय्यकासह चौघांचे निलंबन

पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षांच्या स्वीय सहाय्यकासह चार कर्मचाऱ्यांनी गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केल्याचा ठपका ठेवत त्यांना पालिका सेवेतून निलंबित करण्यात आलं आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु करण्याचे आदेश महापालिका आयुक्त राजेश पाटील यांनी दिले आहेत. काय आहे प्रकरण? वर्क ऑर्डर मिळवण्यासाठीच्या करारनाम्यावर सही करण्यासाठीचे 1 लाख 18 हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने बुधवारी स्थायी समिती अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक ज्ञानेश्वर पिंगळे यांना रंगेहाथ पकडले होते. त्यानंतर स्थायी समिती अध्यक्ष नितीन लांडगे यांच्यासह 4 जणांना अटक करण्यात आली होती. पिंगळे यांच्यासह मुख्य लिपिक विजय शंभुलाल चावरिया, संगणक ऑपरेटर राजेंद्र जयवंतराव शिंदे, शिपाई अरविंद भीमराव कांबळे यांना निलंबित करण्यात आलंय.



स्थायी समितीच्या अध्यक्षांवरही कारवाई दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष नितीन लांडगे यांना शिवाजीनगर कोर्टामध्ये हजर करण्यात आलं होतं. नितीन लांडगे यांच्यासह तिघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. 9 लाखाच्या लाच प्रकरणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नितीन लांडगे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं काल कारवाई केली होती. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकल्या. या प्रकरणात सरकारी वकिलांनी पाच दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. मात्र कुठलेही पुरावे मिळाले नसल्याने न्यायालयाने त्यांना शनिवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. एसीबीच्या कारवाईनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप संघर्ष एसीबीच्या कारवाईनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप असा संघर्ष सुरू झाल्याचं चित्र शहरात दिसून येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीची बैठक पार पडली. त्यानंतर स्थायी समिती अध्यक्ष नितीन लांडगे यांच्या कार्यालयात पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. महापालिकेकडून कामाचे टेंडर मंजूर झाले होते.

# पुण्यात मोहरमच्या मांडवातच गँगवॉर; पूर्ववैमनस्यातून टोळक्याचा गुंडावर कोयत्याने हल्ला

पुणे : पूर्ववैमनस्यातून चांदणे गँगच्या टोळक्याने रेकॉर्डवरील गुंडावर कायत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना खडकी बाजार येथील कसाई मोहल्लामधील मोहरमच्या मंडपात शनिवारी दुपारी साडेतीन वाजता घडली.साहिल ऊर्फ भिंगरी समीर खान (वय १९, रा. खडकी बाजार) याने खडकी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसानी शुभम आगलावे, सलमान शेख, नकुल गायकवाड, प्रजय काळे, तरुण यांच्यावर गुन्हा दाखल केला असून प्रतिक राहुल लोंढे (वय १८, रा. खडकी बाजार) याला अटक केली आहे.साहिल खान हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील आहे. डिसेंबर २०२० मध्ये आरोपींनी फिर्यादीचे विरुद्ध पोलीस केस केली होती. खान हा शनिवारी मोहरमच्या मंडपात बसला असताना आरोपी मोटारसायकलवरुन ट्रीपलसीट आले. सलमान शेख याने साहिल खानला खुन्नसने का पहातो,



आम्ही चांदणे गँगचे भाई आहोत. खडकी भागात आमची दहशत आहे. असे म्हणून आरोपींनी त्याला घेरले.सलमान शेख याने त्याच्याकडील कोयत्याने साहिलच्या डोक्यात व चेहऱ्यावर तसेच पायाचे मांडीवर, हातावर मारुन जबर जखमी केले. फिर्यादी जीव वाचविण्यासाठी पळून जात असताना त्याच्यावर दगड फेकून मारले व परिसरात दहशत पसरवून निघून गेले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898